SPECIAL ISSUE

# KNOWLEDGE RESONANCE

ISSN : 2231-1629

A HALF YEARLY PEER REVIEWED REASERCH JOURNAL

(Evaluated in the SJIF Journal Masters List Evaluating Process with Impact Factor of 8.072 for Year 2021 )


## Department of Political Science

Organized

## One Day Virtual National Seminar

# Changing Dynamics of India's Foreign Policy

**28th September, 2021**



JOINTLY ORGANIZED BY

| DR. M.K. UMATHE COLLEGE NAGPUR | ANNASAHEB GUNDEWAR COLLGE, NAGPUR | PRINCIPAL ARUNRAO KALODE MAHAVIDYALALA, NAGPUR | GOVINDRAO WARJURKAR ARTS AND COMMERCE COLLEGE, NAGBHID |
|---|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 19. | भारताचे परराष्ट्र धोरण आणि ब्रिक्स<br>डॉ. नरेंद्र के. पाटील | 60 |
| 20. | भारताचे परराष्ट्र धोरण व ब्रिक्स समूह<br>डॉ. राजेश पी. कांबळे | 63 |
| 21. | भारताचे परराष्ट्र धोरण : ब्रिक्स संघटना आणि आव्हाने<br>प्रा. डॉ. किशोर कल्लापा म्हेत्री | 65 |
| 22. | भारताचे परराष्ट्र धोरण व सुरक्षा परिषदेत भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या दावेदारीचे औचित्य<br>डॉ. राष्ट्रपाल गणवीर | 70 |
| 23. | भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे बदलते स्वरूप<br>प्रा. तक्षशील एन. सुटे | 74 |
| 24. | भारताच्या परराष्ट्र धोरणाची आवश्यकता आणि निर्मिती<br>मनोहर रामचंद्र चौधरी | 77 |
| 25. | भारताचे परराष्ट्रीय धोरणः एक चिकित्सक अध्ययन<br>डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 81 |
| 26. | पंतप्रधान नरेंद्र मोदी कालखंडातील भारताचे परराष्ट धोरण<br>प्रा. लक्ष्मन बाबाराव यादव | 87 |
| 27. | भारतीय परराष्ट्र धोरणः सर्वसमावेषक सुरक्षा दृष्टीकोन<br>डॉ. कविता डी. धर्माधिकारी | 89 |
| 28. | भारताच्या परराष्ट्र धोरणातील निर्धारक घटक<br>प्रफुल्ल लक्ष्मण किरवले | 95 |
| 29. | भारतीय परराष्ट्र धोरणः भारत चीन संबंध<br>पुरुषोत्तम बाबासाहेब पाचोडे | 98 |
| 30. | भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारक, समस्या आणि आव्हाने<br>प्रा. डॉ. सुशांत चिमणकर | 101 |
| 31. | भारताचे परराष्ट्र धोरणः निर्धारक घटक, समस्या आणि आव्हाने<br>रत्नदीप राजेंद्र गणवीर | 106 |
| 32. | भारताचे शेजारिल राष्ट्रांशी धोरण<br>प्रा. डॉ. प्रतिभा गडवे (दातीर) | 110 |
| 33. | मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण उपलब्धी आणि आव्हाने<br>प्रा. किशोर एम. नैताम | 113 |
| 34. | भारत – बांग्लादेश संबंध<br>डॉ. एस.पी. वेल्हाळ | 116 |
| 35. | भारताचे परराष्ट्रीय धोरण – एक वास्तववादी चिंतन<br>प्रा. विरेंद्र मुरलीधर घरडे | 121 |
| 36. | छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श परराष्ट्रीय धोरण<br>डॉ. मधुकर विठोबा जाधव | 125 |
| 37. | भारत-चीन संबंधाच्या पुनर्विचाराची गरज<br>डॉ. संतोष संभाजी डाखरे | 130 |
| 38. | भारत अफगाणिस्तान संबंध काल व आज<br>प्रा. ए. बी. राऊत | 133 |
| 39. | भारताचे परराष्ट्रीय धोरण<br>डॉ. कल्पना आर. टेकाडे | 136 |

ISSN 2231-1629 Knowledge Resonance
A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal
IMPACT FACTOR 8.072

# भारताचे परराष्ट्रीय धोरणः एक चिकित्सक अध्ययन

डॉ. सुभाष दौलतराव उपाते
*सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख*
*आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,*
*देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली*

**सारांश (Abstract)**
*जागतिकीकरणाच्या प्रक्रियेअंतर्गत आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण झालेले आव्हानांना सामोरे जाणे, शितयुध्दोत्तर काळात विकसित झालेल्या नवीन विश्वरचनेशी राष्ट्रीय हित संबंधाच्या संरक्षणासाठी जुळवून घेणे, आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे वास्तववादी पाहण्याची मानसिकता भारतीय धोरणकर्त्यांमध्ये आकाराला आली. एक विभागिय महासत्ता म्हणून भारत विकास पाहून विकसिशिल राष्ट्रांचे नेतृत्व करणे, यातूनच राजनयाचा आकृतीबंध तयार करणे, भारतीय परराष्ट्रीय धोरणातील सातत्य आणि स्थित्यंतर यांचा बदलता प्रवाहाचा चिकित्सक अभ्यास.*

**Key Words :**
*1) आदर्शवाद 2) राष्ट्रीय सुरक्षा 3) जागतिकीकरण 4) तंत्रज्ञानात वाढ 5) व्यावहारिकता*

**प्रस्तावना :**
भारतीय परराष्ट्र धोरणाच्या विकासाचे प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व कालखंड, स्वातंत्र्योत्तर कालखंड आणि शीतयुध्दोत्तर कालखंड असा बदलत्या संदर्भाचा प्रवाह आणि 19 व्या शतकापासूनच परराष्ट्रीय धोरणाच्या विकासासाठी भारतीय परराष्ट्रीय धोरणाची सैध्दांतिक चौकट तपासतांना रविंद्रनाथ टागोर, श्री. अरबिंदो, महात्मा गांधी आणि पंडित नेहरु, लाल बहादूदूर शास्त्री, श्रीमती इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी. व्ही. नरसिंहरा, मनमोहन सिंग आणि विद्यमान पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचा परराष्ट्रीय धोरणावर पडलेला प्रभाव.

भारतीय परराष्ट्रीय धोरणाची पायाभूत तत्वे ही भारताच्या स्वातंत्र्य चळवळीबरोबरच विकसित होत गेली. भारतीय परराष्ट्रीय धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या विचारांवर देखील ब्रिटीश उदारमतवादी परंपरेचा जबरजस्त प्रभाव होता. जसे भारताने राष्ट्रकुल संघटनेचे स्विकारलेले सदस्यत्व. स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या पंचशील धोरणाचा आधार मानतांना डॉ. एन. व्ही. राजकुमार म्हणाले होते “ These were the earliest expressions of Indias dislike of getting involved in unnecessary foreign entanglements and favoring a neutral stand on matters that did not concern her.”[1] आदर्शवादी दृष्टीकोनातून आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहण्याची मानसिकता 19 व्या शतकापासूनच विकसित होत गेली. कॉंग्रेसने सेक्रेटरी ऑफ स्टेटला लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केले की, “We have not the slightest doubt that, as on as previous occasions... the princes and people of India will readily and willingly cooperate to the best of their capability.”[2] पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर आंरराष्ट्रीय घडामोडींमध्ये भारताचा सहभाग वाढला व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर स्पष्ट आणि ठाम भूमिका घेतली.

**संशोधन पध्दती :**
- प्रस्तुत संशोधनासाठी विषयाची निवड
- संबंधित साहित्याचे सर्वेक्षण
- संशोधन पध्दतीला परिभाषित करणे
- संकल्पनांचे स्पष्टीकरण
- उद्दिष्टांची मांडणी

**गृहितके :**
- स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील परराष्ट्रीय धोरण आदर्शवादी होते.
- परराष्ट्रीय धोरणाला वास्तविक व धोरणात्मक दिशा मिळाली.
- विद्यमान परराष्ट्रीय धोरण व्यावहारिक आहे.

**उद्दिष्ट्य :**
1. पंडित नेहरु यांच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील भूमिका आदर्शवादी होती.
2. श्रीमती इंदिरा गांधींचे धोरण हे वास्तविक व धोरणात्मक होते.
3. 1991 नंतर खुल्या आर्थिक व्यवस्थेचा स्विकार केला व व्यावहारिकता आली.

**डदिदष्टांचे विश्लेषण :**
1) पंडित नेहरु यांच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील भूमिका आदर्शवादी होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीयांच्या विचारांमध्ये संघटीतपणा आणि सुत्रबध्दता आली. आयरिश लोकांच्या स्वातंत्र्य चळवळीसंबंधी सहानूभूती आणि समर्थन दाखविणारा भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचा 1920 चा ठराव. 1921 ला अखिल भारतीय कॉंग्रेस समितीने दिल्ली येथे बैठकीत भारतीय परराष्ट्र धोरणासंबंधी निर्णयात म्हटले की, केवळ शेजारी राष्ट्रांचाच नाहीतर जगातील प्रत्येक राष्ट्रांशी शांततेचे, मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापित करेल. भारतीयांचा दृष्टीकोण व्यापक होण्यामागचे प्रमुख कारण प्रसिध्द व्हर्सायच्या तहावर भारताने केलेली स्वाक्षरी आणि राष्ट्रसंघाचे स्विकारलेले सदस्यत्व. या आतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना पहिल्या महायुध्दादरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वूड्रोविल्सन यांच्या जगप्रसिध्द ''14 कलमी